जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2018

Times of India

# 'Sports offers lot of biz opportunities'

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Sports professor Huang Yu of Taiwan's National Tsing Hua University (NTHU) on Friday said that budding entrepreneurs have ample opportunities in sports and they need to focus on the requirements of players.

Huang was speaking at a workshop on sports science at the Shivaji University, Kolhapur (SUK).

The professor said the NTHU has signed memoranda of understanding (MoU) with around 290 universities across the world, but "SUK is the first university with which we have signed an MoU on sports."

Huang said the NTHU has a 300-acre campus in Taiwan and the MoU will help the SUK as well as NTHUs players and athletes.

Professor Siang Liu, another delegate of NTHU, said that a coach is an important part of a player's life and coaches need to focus on and identify sportspersons' skills and adopt advanced techniques.

SUK vice-chancellor Devanand Shinde said that to succeed in one sport, its psychology needs to be known to the players. "Team spirit is an important part for a player and it can help him/her in excelling in their game," he said.

"Sportspersons are an important part of society. In the era of globalisation, we need to involve more people in sports."

The officials of SUK said the Taiwan delegation visited various schools, wrestling 'akharas' and interacted with the players during their three-day tour, which concluded on Friday.

The officials said that the university is planning to develop a new model for budding players to sensitise students on participating in sports activity.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JUL 2018
तरुण भारत

# पेयजल गुणवत्ता अभ्यासक्रमाची सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण शास्त्र विभागाच्या वतीने ' पेयजल गुणवत्ता व्यवस्थापन' मूल्यवर्धित विकास अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांना हा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी भारत सरकारचे अनुदान मिळाले आहे.

अभ्यासक्रमामध्ये जल संसाधने, त्यांची सध्य स्थिती, जलजन्य आजार, जल शुद्धीकरनाच्या पद्धती, ग्रामीण पाणीपुरवठा, आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या अभ्यासक्रमाची सांगता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विभागीय अधिकारी नागेश लोहाळकर यांच्या उपस्थितीत झाली. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपविभागीय अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी पिण्याचे पाणी आणि त्याची गुणवत्ता याबद्दल माहिती दिली. अभ्यासक्रमासाठी डॉ. निलेश वाघ, डॉ. प्रमोद कांबळे ,डॉ. आशिष माने ,डॉ. विनायक धुळप,, मंजुषा जाधव, डॉ पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, डॉ. पल्लवी भोसले, डॉ. सोनल चोंदे, नंदकिशोर गायकवाड, अमोल चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

# विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात प्रवेश सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे पदवी व पदव्युत्तर विषयाच्या प्रवेशाच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला. www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर distance education या लिंकवर ऑनलाईन अर्ज उपलब्ध आहे.

दूरशिक्षण केंद्राच्या वतीने सुरु असलेल्या प्रवेश प्रक्रियेत बी.ए., बी. कॉम., एम. ए. (भाषा, सामाजिकशास्त्र), एम. ए. जैनॉलॉजी आणि प्राकृत, लोकप्रशासन, एम. कॉम, एम. एस्सी. (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्स्लेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रवेश प्रक्रिया द्वितीय व तृतीय वर्षाचे नियमित, पुनर्परीक्षार्थी यांच्यासाठी आहे, अशी माहिती उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा, जिल्ह्यांतील ७७ अभ्यासकेंद्राच्या आयोजित प्रवेश प्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे होते. डॉ. सोनजे म्हणाले, ज्या विद्यार्थ्यांना द्वितीय, तृतीय वर्षाला प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी unishivaji.ac.in या संकेतस्थळावर आपला आणि युझर आयडी, पासवर्ड वापरुन आपल्या प्रोफाईलमधून प्रवेश नि परीक्षा अर्ज भरावा. त्यानंतर जर विद्यार्थी पूर्वीच्या सत्र परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी असेल, तर त्यांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये तयार असलेला परीक्षा अर्ज भरावा. नियमित शुल्कासह दि. ४ ऑगस्टपर्यंत, विलंब शुल्कासह १० ऑगस्ट, तर १६ ऑगस्टपर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत आहे. या कार्यशाळेमध्ये कोअर सॉफ्टवेअरचे इंजिनिअर सुभाष कोकरे, वित्त व लेखा विभागाचे लेखाधिकारी प्रमोद पेठकर यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाच्या वतीने मोफत स्वयंम कोर्सेस सुरु करण्यात आले आहेत. 'कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन' अभ्यासक्रमासाठी नावनोंदणी करावी, असे आवाहन डॉ. रुपाली संकपाळ यांनी केले. समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डी. के. कमलाकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

लोकमत

## ह्युअँग यू : शिवाजी विद्यापीठातील 'क्रीडा विज्ञान' कार्यशाळा

# क्रीडा क्षेत्रात नवउद्योजकांना संधी

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : क्रीडाक्षेत्रात नवउद्योजकांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. खेळाकडे फक्त खेळ म्हणून न पाहता खेळाडूंना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे लागणारे साहित्य सुविधा पुरविण्याकडे लक्ष केंद्रित केल्यास या क्षेत्रामध्ये नवउद्योजकांसाठी संधीच्या प्रचंड वाटा निर्माण होणार आहेत, असे प्रतिपादन तैवानच्या त्सिंघुआ विद्यापीठाचे द्विसदस्यीय शिष्टमंडळातील शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'क्रीडा विज्ञान' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. सिअँग लियू प्रमुख उपस्थित होते. प्रा. ह्युअँग यू म्हणाले, वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित केलेल्या खेळांमुळे तेथील स्थानिकांना, उद्योजकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते.

विविध संस्थांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाने क्रीडाविषयक शिक्षणाच्या उद्योगास प्रोत्साहन दिले जाते. 'त्सिंघुआ' आणि शिवाजी विद्यापीठातील सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांच्या खेळाडूंना लाभ होणार आहे.



### प्रशिक्षकांचे लक्ष आवश्यक

- शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या क्रीडाकौशल्याकडे प्रशिक्षकांनी जाणीवपूर्वक लक्ष दिल्यास उत्तम खेळाडू निर्माण होतील.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडविण्यासाठी पारंपरिक क्रीडाकौशल्यापेक्षा आधुनिक क्रीडाकौशल्ये आत्मसात करण्याकडे प्रशिक्षकांचा ओढा असला पाहिजे.
- खेळाकडे आर्थिक उन्नतीचे साधन म्हणून पाहिल्यास ते शहरांचा विकास होण्यास साहाय्यभूत ठरते, असे प्रा. सिअँग लियू यांनी सांगितले.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंना यशस्वी होण्यासाठी खेळाचे मानसशास्त्र अवगत असणे गरजेचे आहे. खेळाडू आणि खेळांमध्ये वापरले जाणारे शास्त्र या दोहोंमध्ये समन्वय साधल्यास खेळाचा निश्चितपणे विकास होणे शक्य आहे.

या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बंध निर्माण होत आहेत. या कार्यक्रमात क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. इंग्रजी अधिविभागाच्या डॉ. टी. के. करिकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, शिवाजी विद्यापीठ आणि कार्यक्षेत्रातील क्रीडाविषयक सोई-सुविधांची पाहणी करण्यासाठी आलेल्या 'त्सिंघुआ'च्या शिष्टमंडळाच्या तीनदिवसीय दौऱ्याचा शुक्रवारी समारोप झाला.

# ४ ऑगस्टअखेर दूरशिक्षण प्रवेश

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामार्फत पदवी व पदव्युत्तर विषयाच्या प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली आहे. दूर शिक्षण केंद्राच्यावतीने सुरू असलेल्या प्रवेशप्रक्रियेत बी.ए, बी.कॉम, एम.ए, (भाषा/सामाजिकशास्त्र) एम. ए. जेनॉलॉजी आणि प्राकृत, लोकप्रशासन, एम.कॉम, एम.एस्सी. (गणित), पी.जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्हातील ७७ अभ्यासकेंद्राच्या आयोजित प्रवेशप्रक्रिया कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे होते.

या कार्यशाळेमध्ये कोअर सॉफ्टवेअरचे इंजिनिअर सुभाष कोकरे यांनी ऑनलाईन प्रवेशप्रक्रियेबाबत डेमो दाखविण्यात आला. वित्त व लेखा विभागाचे लेखाधिकारी प्रमोद पेठकर यांनी ऑनलाईन पेमेंटबाबत माहिती दिली. त्यात येणाऱ्या अडचणी सोडवण्याबाबत मार्गदर्शन केले. केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाच्यावतीने मोफत स्वयम कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. 'कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी इन एज्युकेशन' चा अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी करण्यात यावी, असे आवाहन समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी केले. ऑनलाईन अर्ज www.unshivaji.ac.in या वेबसाइटवर Distance Education या लिंकवर उपलब्ध आहे.

# तंत्रज्ञान विभागात कार्यशाळा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन शाखेतर्फे आयोजित केलेल्या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वेल्लोर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे डॉ. जयेंद्र कुमार यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

यावेळी बोलताना डॉ. एम. के. भानारकर म्हणाले की, नवीन तंत्रज्ञानाचा वेध घेत विद्यार्थ्यांनी वाटचाल केली पाहिजे. त्यादृष्टीने सिम्युलेशन टूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रयोगशाळा व सॉफ्टवेअरसारख्या पायाभूत सुविधांवर भर देत तंत्रज्ञान विभाग व विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स विभाग एकसंधपणे काम करेल.

तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. प्रा. जयदीप बागी म्हणाले, 'तुलनेने नवीन असलेल्या तंत्रज्ञान अधिविभागाने अल्पावधीतच लक्षणीय प्रगती केली आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार शिक्षण पोहचवण्याच्या विद्यापीठाच्या ध्येयाशी सुसंगत वाटचाल हा विभाग करत असून टेक्युप या जागतिक बँकेच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याअंतर्गत विभागाला एकूण १७ कोटीचे अनुदान लाभले आहे.'

प्रा. उदय पाटील यांनी संयोजन केले.

# नवउद्योजकांसाठी क्रीडाक्षेत्रात मोठ्या संधी

कोल्हापूर : प्रतिनिधी



प्रा.ह्युअॅग यू

नवउद्योजकांसाठी क्रीडाक्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध आहेत. खेळाकडे फक्त खेळ म्हणून न पाहता खेळाडूंना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे लागणारी साहित्यसुविधा पुरविण्याकडे लक्ष केंद्रित केल्यास या क्षेत्रामध्ये नवउद्योजगांसाठी संधीच्या प्रचंड वाटा निर्माण होणार असल्याचे प्रतिपादन तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रा.ह्युअॅग यू यांनी येथे केले.

## प्रा. ह्युअॅग यू; विद्यापीठात क्रीडा विज्ञान कार्यशाळा

### पायाभूत सुविधा आणि दर्जेदार खेळाडू

*तैवान हा देश भारताच्या तुलनेने लहान आहे. या देशातील सर्व शैक्षणिक संस्था या सरकारच्या अखत्यारीत आहेत. या संस्था सरकारी अखत्यारीत असूनही खेळाडूंसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा मात्र दर्जेदार आहेत. त्या तुलनेत भारतात खेळांच्या पायाभूत सुविधा कमी आहेत. पण तैवानच्या तुलनेत भारतीय खेळाडू मात्र दर्जेदार असल्याचे कार्यशाळेतील मान्यवरांच्या भाषणातून स्पष्ट झाले.*

तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या विद्यापीठ भेटीच्या समारोपाच्या तिसऱ्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'क्रीडा विज्ञान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय खेळावर आधारित कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर प्रा.ह्युअॅग यू बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

प्रा. ह्युअॅग यू म्हणाले, वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित केलेल्या खेळांमुळे तेथील स्थानिकांना, उद्योजकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. तैवानच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचा ३३६.२ एकराच्या भव्य परिसरामध्ये नंदा कॅम्पसमध्ये विविध खेळांची मैदाने विस्तारलेली आहेत. या सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांच्या खेळाडूंना लाभ होणार आहे. त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठ हे तैवानमधील क्रमांक एकचे विद्यापीठ असून जगामध्ये नावाजलेल्या विद्यापीठांशी २९० शैक्षणिक करार केलेले आहेत. परंतु, शिवाजी विद्यापीठ हे तैवान विद्यापीठाशी क्रीडाविषयक करार करणारे पहिले विद्यापीठ



विद्यापीठातून...

आहे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आंतरराष्ट्रीयस्तरावर खेळाडूंना यशस्वी होण्यासाठी खेळाचे मानसशास्त्र अवगत असणे गरजेचे आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बंध निर्माण होत आहेत. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ.पी. टी. गायकवाड यांनी स्वागत, इंग्रजी अधिविभागाच्या डॉ. टी. के. करिकट्टी यांनी सूत्रसंचालन तर समन्वयक डॉ. अनिल घुले यांनी आभार मानले. यावेळी विविध महाविद्यालयांतून आलेले शारीरिक शिक्षण संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तांबडा-पांढरा विसरणार नाही**

कोल्हापूरकरांच्या आदरतिथ्याची संस्कृती मनाला भावली. येथील मांसाहारी जेवण लाजवाब आहे. तांबडा-पांढरा आम्ही कधीच विसरणार नाही, असे म्हणत तैवानच्या पाहुण्यांनी कोल्हापुरी खाद्यसंस्कृतीबद्दल प्रशंसोद्गार काढले.

**कुस्तीला सलाम**

तैवानच्या शिष्टमंडळाने कोल्हापुरातील अनेक संस्था व शाळा, कॉलेजला भेटी दिल्या. यावेळी त्यांच्यासमोर विविध खेळांचे सादरीकरण करण्यात आले होते. यामध्ये फुटबॉल खेळाडूंची जिगर पाहून ते थक्क झाले होते. आज बोलताना त्यांनी कोल्हापूरच्या लाल मातीतल्या कुस्तीला बोलताना सलाम केला.

# शिवाजी विद्यापीठात शोभीवंत मासे विषयावर प्रशिक्षण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभाग आणि रत्नागिरी येथील कॉलेज ऑफ फिशरीजच्या वतीने २३ जुलैपासून शोभीवंत रंगीबेरंगी माशांचे बिजोत्पादन आणि संगोपन या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. प्राणीशास्त्र अधिविभागात हे प्रशिक्षण असणार आहे. प्रशिक्षण २८ जुलैपर्यंत असेल अशी माहिती विभागप्रमुख डॉ.व्ही. एस. मन्ने यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

# विद्यापीठातील पाणवठे ओव्हरफ्लो

## जलयुक्त उपक्रमाला यश; भूजल पातळीमध्ये कमालीची वाढ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

▶▶ पान २ वर



कोल्हापूर : संगीतशास्त्र विभागासमोरील तलावाचे विहंगम दृश्य.

(छाया : एस. आर.)



कोल्हापूर : पूर्ण क्षमतेने भरलेला वि.स. खांडेकर भाषा भवनामागील तलाव. (छाया : एस. अली)

# विद्यापीठातील पाणवठे ओव्हरफ्लो

(पान १ वरून) याअंतर्गत तीन शेततळी विकसित करण्यात आली. त्याअंतर्गत तीन शेततळी निर्माण करण्यात आली. त्याचबरोबर विद्यापीठ परिसरातील सुतार विहीर, क्रीडा अधिविभाग विहीर आणि रसायनशास्त्र अधिविभागाची विहीर गतवर्षीप्रमाणे यंदाही तुडंब भरली आहे, तर विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकच्या मागील बाजूची आणि शिंदे विहीर या दोन विहिरींमधील गाळ काढून यंदा पुनरुज्जीवन करण्यात आले होते, तेव्हापासून या दोन्ही विहिरीसुद्धा भरून ओसंडून वहात आहेत.

गेल्या तीन वर्षांपासून विद्यापीठाची जलसमृद्धी वाढावी, पहिले दोन वर्ष पाणी साठवणूक क्षमता वाढावी, यासाठी प्रयत्न करण्यात आले. या वर्षीपासून परिसरातील भूजल पातळी वाढावी, यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्रशासनाच्या या प्रयत्नांना चांगले यशही आले आहे. विद्यापीठाचा पाणीसाठा वाढल्याने विद्यापीठास ७० लाख रुपयांचे महापालिकेकडून खरेदी करावे लागणारे पाणी बंद करण्यात आले आहे, तर परिसरातील भूजल पातळीमध्येही वाढ झाली आहे. परिसरातील काही भागामध्ये साधारण पाच फुटांवरही पाणी लागत आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरही घेण्यात आली आहे.

**पाणवठ्यांची क्षमता**

| | |
|---|---|
| भाषा भवन तलाव | २२ कोटी १५ लाख लिटर |
| संगीत अधिविभाग तलाव | ५ कोटी २० लाख लिटर |
| सुतार विहीर | ४ लाख लिटर |
| क्रीडा अधिविभाग विहीर | ४.८७ लाख लिटर |
| रसायनशास्त्र अधिविभाग विहीर | ३ लाख लिटर |
| सिंथेटिक ट्रॅकशेजारील विहीर | ५ लाख लिटर |
| शिंदे विहीर | ३ लाख लिटर |
| तीन नूतन शेततळी | एकूण ४० लाख लिटर |

# खेळांमध्ये रोजगाराची संधी

खेळाडूंना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे साहित्य सुविधा पुरविण्याकडे लक्ष केंद्रीत केल्यास या क्षेत्रात नव उद्योजकांना व्यवसायाच्या संधी आहेत, असे प्रतिपादन तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रा. हयुँग यू यांनी केले.

**सविस्तर वृत्त पान २ वर »**

# खेळांमध्ये रोजगाराची संधी

## प्रा. हयुँग यू; 'क्रीडा विज्ञान' विषयावर विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. २० :** खेळाडूंना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे साहित्य सुविधा पुरविण्याकडे लक्ष केंद्रित केल्यास या क्षेत्रात नवउद्योजकांना व्यवसायाच्या संधी आहेत, असे प्रतिपादन तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे प्रा. हयुँग यू यांनी केले.

तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या शिवाजी विद्यापीठ भेटीच्या अंतिम तिसऱ्या दिवशी 'क्रीडा विज्ञान' विषयावर कार्यशाळा झाली. त्या वेळी ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय खेळावर आधारित ही कार्यशाळा होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा झाली.

प्रा. यू म्हणाले, ''वेगवेगळ्या



**कोल्हापूर : तैवानच्या त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शिष्टमंडळातील प्रा. हयुँग यू 'क्रीडा विज्ञान' विषयावरील कार्यशाळेत बोलताना. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

शहरांत खेळांमुळे तेथील स्थानिकांना, उद्योजकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते. तैवानच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचा ३३६.२ एकराच्या परिसरात नंदा कॅम्पसमध्ये विविध खेळांची मैदाने आहेत. सामंजस्य करारामुळे दोन्ही विद्यापीठांच्या खेळाडूंना त्याचा लाभ होणार आहे. त्सिंगहुआ विद्यापीठ तैवानमधील क्रमांक एकचे विद्यापीठ असून जगभरातील नावाजलेल्या विद्यापीठांशी २९० शैक्षणिक करार केले आहेत. पण शिवाजी विद्यापीठ तैवान विद्यापीठाशी क्रीडाविषयक करार करणारे पहिले आहे.''

प्रा. सियांग लियू यांनी शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याकडे प्रशिक्षकांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे, असे आवाहन केले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडविण्यासाठी पारंपरिक क्रीडा कौशल्यांपेक्षा आधुनिक क्रीडा कौशल्ये आत्मसात करण्याकडे प्रशिक्षकांचा ओढा असला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक डॉ.अनिल घुले उपस्थित होते. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. इंग्रजी अधिविभागाच्या डॉ. टी. के. करेकट्टी यांनी सूत्रसंचालन केले.